# वाल्मीकीच्या दृष्टीतून शबरी-दर्शन
## डॉ. म. बा. कुलकर्णी

शबरी ही राम-भक्तांपैकी एक प्रख्यात भक्त-स्त्री आहे. ईश्वरसेवा अथवा ईश्वरभक्ती करण्याचा अधिकार सर्व भारतीय धर्मपंथांमध्ये पुरुषांइतकाच स्त्रियांनाही आहे. स्वर्गप्राप्तीच नव्हे तर मोक्षप्राप्तीही करून घेण्याची क्षमता पुरुषांइतकीच स्त्रियांमध्येही आहे, आणि मोक्षमार्गावरील स्त्रियांची काही उदाहरणे भारतात वैदिक काळापासून आजतागायत उपलब्ध आहेत. स्त्रीपुरुष समानता हा विचार भारतीय संस्कृतीला नवीन नाही. उलट स्त्रीबद्दलचा आदरभाव हे या संस्कृतीचे एक वैशिष्ट्य मानले पाहिजे. त्यामुळे, शबरी केवळ स्त्री असल्याने तिच्याबद्दल कोणताही न्यूनभाव मनात येऊ न देता भारतीयांनी ती एक रामभक्त स्त्री आहे या एकाच विचाराने तिच्याबद्दल आदर बाळगलेला आहे.

शबरी ही एक राम समकालीन स्त्री आहे. रामापेक्षा वयाने पुष्कवच अधिक; पण तिने रामाचे प्रत्यक्ष दर्शन घेतलेले आहे. रामाच्या अवतार काळात ती वावरलेली आहे. राम वनवासात असतांना तिची व रामाची प्रत्यक्ष भेट झालेली आहे. आणि ही भेट देखील रामाच्या वनवासकाळातील एक महत्त्वाची भेट ठरलेली आहे.

त्यामुळे, रामचरित्र सांगणाऱ्या वाल्मीकी ऋषींनी आपल्या रामायण या ग्रंथात या भेटीचा वृत्तांत विस्ताराने वर्णन केलेला आहे. रामचरित्र सांगणाऱ्या ग्रंथांपैकी वाल्मिकी-रामायण हा सर्वात प्राचीन ग्रंथ आहे. त्यामुळे त्यातले राम-शबरी भेटीचे वर्णन ऐतिहासिक दृष्टीने विशेष महत्त्वाचे आहे. राम लक्ष्मणांची शबरीशी झालेली भेट ही एक ऐतिहासिक घटना आहे.

ऐतिहासिक घटनांचे पुरावृत्तात, पुढे त्याचेच पुराकथेत (म्हणजेच मिथकात) रूपांतर होत असते. तसे याही घटनेचे झालेले आहे. शबरी वृत्तांताचे हे परिवर्तन अर्थपूर्ण आहे.

वाल्मीकींनी मुळात या घटनेचे वर्णन कसे केलेले आहे?

वाल्मीकी रामायणातील तिसऱ्या म्हणजे अरण्यकांडात हा वृत्तांत आलेला आहे.

रावणाने सीतेचे अपहरण केल्यानंतर, सीतेचा शोध करीत राम-लक्ष्मण दंडकारण्यात जनस्थानातून दक्षिणेकडे निघालेले होते. वाटेत कबन्ध या एका दानवास त्यांनी शरण आणले. त्याच्याशी झालेल्या संभाषणात रामाने कबंधाला रावणासंबंधी माहिती विचारली तेव्हा त्याने, मला काही सांगता येणार नाही, परंतु येथून पुढे ऋष्यमूक पर्वताकडे तू जा, तिथे सुग्रीव हा वानरांचा निर्वासित राजा तुला भेटेल; त्याची तुला या बाबतीत मदत होऊ शकेल असे त्याला सांगितले.

राम-लक्ष्मणांना सर्वच प्रदेश अपरिचित होता. तेव्हा कबन्धानेच त्यांना पुढच्या मार्गाच्या काही खुणा सांगितल्या. तो म्हणाला,

रामा येथून तू पुढे गेलास की पंपा नावाच्या पुष्करिणीपाशी पोहोचशील. या पंपा सरोवराचे वैशिष्ट्य असे की, तिथले हंस, क्रौंच पक्षी किंवा हरिणेही माणसांचे दर्शन झाले तरी निर्भयपणे वावरतात. कारण अद्याप तरी त्यांची माणसांनी शिकार केलेली त्यांनी अनुभवलेली नाही! रामायणातले ते वाक्य असे आहे -

तत्र हंसाः प्लवाः क्रौंचाः कुरराश् चैव राघव।
नोद्विजन्ते नरान् दृष्ट्वा वधस्याकोविदाः पुरा।।

वधस्य अकोविदाः म्हणजे वधाची माहितीच नसलेले!

म्हणजे हे वातावरण किती अहिंसक आहे नाही? -

कारण त्या भागात मतंग ऋषींनी वसती केलेली होती. आणि त्यांचे शिष्य असलेले अनेक ऋषी अद्यापही तिथे आश्रमात राहात आहेत असेही कबंधाने रामाला सांगितले. आणि मतंग ऋषींच्या त्या शिष्यपरिवारातलीच एक शिष्या म्हणजे शबरी! (आश्रमामध्ये पुरुषांप्रमाणेच स्त्रियाही अध्ययनासाठी येऊन राहात असत, याचेही हे एक चिह्न!)

वाल्मीकींचे शब्द आहेत -

तेषाम् अद्यापि तत्रैव दृश्यते परिचारिणी।
श्रमणी शबरी नाम काकुत्स्थ चिरजीविनी।।

हे रामा, त्यांच्यापैकी (त्या शिष्यांपैकी) शबरी नावाची एक वृद्ध श्रमणी (तपस्विनी) तिथेच सेवारत असलेली (परिचारिणी) तुला भेटेलच. (दृश्यते, दिसते. दिसणे उ भेटणे).

ही शबरी किती वृद्ध असावी याची कल्पना पुढील वाक्यावरून यावी. कबन्धाचे (वाल्मीकी रामायणातले) ते वाक्य असे -

त्वां तु धर्मे स्थिता नित्यं सर्वभूतनमस्कृतम्।
दृष्ट्वा देवोपमं राम स्वर्गलोकं गमिष्यति।।

सर्व भूते ज्याला नमस्कार करतात अशा देवासमान असलेल्या तुला ती भेटली की हे रामा, नित्य धर्मनिष्ठ राहणारी ती शबरी, स्वर्गात जाईल! शबरीचा मृत्यू जवळ आलेला असून तिला तुझ्या दर्शनाचा आनंद दे, अशी सूचनाच जणू काही यातून कबंधाने केलेली आहे. अर्थात यात रामदर्शन हा स्वर्गप्राप्तीचा उपाय असल्याचेही स्पष्ट केलेले आहेच.

वाल्मीकीने शबरीचे वर्णन करतांना तिच्यासाठी वापरलेली विविध विशेषणे उल्लेखनीय आहेत. ती अशी -

जटिला - जिने जटा वाढविलेल्या आहेत; चीर कृष्णा जिनांबरा जीर्णवस्त्र आणि कृष्णाजित (कृष्ण मृगाचे, हरिणाचे कातडे) पांघरणारी.

वृद्धा - वय झालेली; चिरजीविनी. दीर्घ काल जीवन उपभोगलेली.

संशितव्रता - काटेकोरपणाने नियम पाळणारी व्रतधारी.

तापसी - तपस्विनी, तपाचरण करणारी.

सिद्धा - सिद्धी प्राप्त झालेली.

सिद्धसंमता - सिद्ध पुरुषांकडून मान्यता-सन्मान-प्राप्त झालेली.

श्रमणी - श्रम करणारी.

अशी ही विविध विशेषणे शबरीचे एक चित्र आपल्यापुढे उभे करू शकतात.

राम लक्ष्मण या वनात आलेले असून ते इकडेच पंपा सरोवराकडे येत आहेत, हे वृत्त शबरीच्या कानांवर आलेले होते. त्यामुळे ती त्यांची वाटच पाहात होती.

राम लक्ष्मण पंपा सरोवराच्या पश्चिम तीरावर आले तेव्हा त्यांना शबरीचा रम्य आश्रम दिसला. ते दोघेही त्या आश्रमाजवळ आले. शबरीने 'कृताञ्जली' होऊन म्हणजे हात जोडून त्यांचे स्वागत केले. राम लक्ष्मणांचे तिने पादाभिवंदन केले.

पाद्यम् आचमनीयं च सर्वम् प्रादाद् यथाविधी।।

तिने त्यांना पाद्य - (पाय धुवायला पाणी) आणि आचमनीय (पिण्यासाठी पाणी) - इत्यादी सर्व यथाविधी दिले.

रामाने तिची विचारपूस केली. तिचे तप व्यवस्थित चालू आहे ना, कसली विघ्ने तर नाहीत ना, तिने केलेली गुरुशुश्रूषा सफल झाली आहे ना - इत्यादी प्रश्न त्याने तिला विचारले. तेव्हा

अद्य प्राप्ता तपःसिद्धिस् तव सन्दर्शनात् मया।

आज तुझे दर्शन झाले, माझ्या तपाचे फळ मला मिळाले, असे तिने उत्तर दिले! ती पुढे म्हणाली, 'रामा, तू चित्रकूटावर आलास नां, तेव्हापासूनच मी तुझी वाट पाहते आहे. कारण, तू इकडे येशीलच, असं मला इथल्या माझ्या गुरुंनी - ऋषींनी सांगितले होते. ती पुढे म्हणाली -

मया तु विविधं वन्यं संचितं पुरुषर्षभ।
तवार्थे पुरुषव्याघ्र पंपायास् तीरसंभवम्।।

हे पुरुषश्रेष्ठा, तुझ्यासाठी मी पंपा सरोवराच्या काठी येणारी वनातली काही द्रव्ये - फळे फुले इ. एकत्र करून इथे आणली आहेत.

रामाने त्याचा स्वीकार करून तिला म्हटले, 'मी मतंग ऋषींच्या -तुझ्या गुरुच्या - प्रभावाबद्दल ऐकले आहे; तर ते मला तू सांग. तेव्हा

शबरी दर्शयामास तावुभौ तद् वनं महत्।

शबरीने त्या दोघांना - राम लक्ष्मणांना ते विशाल वन हिंडून दाखविले. या वनाला 'मतंग वन' असे म्हणतात असे सांगून तिने मतंग ऋषींनी जिथे आपला देह ठेवला ती वेदी त्यांना दाखवली. त्या वनात नित्य विकसित कमळे, फुलाफळांनी बहरलेले वृक्ष आणि प्रकाशमान वातावरण यांचे दर्शन तिने त्यांना घडविले.

आणि नंतर जीवन कृतार्थ झाल्याची भावना व्यक्त करून तिने, आपल्या जीर्ण देहाचा त्याग केला. रामाच्या उपस्थितीत तीने आपले प्राण सोडून स्वर्ग प्राप्ती करून घेतली.

पंपा सरोवरापासून जवळच असलेल्या ऋष्यमूक पर्वताकडे राम लक्ष्मण चालू लागले. कारण त्यांना तिथे सुग्रीवाची भेट घ्यायची होती.

वाल्मीकीच्या कथनात या वृद्ध, सिद्ध, सिद्धसंमता अशा तपस्विनीचे नाव शबरी आहे. परंतु तिचा सामाजिक वर्ण काही कुठे सांगितलेला नाही. शिवाय, लौकिक कथेतील शबरीची उष्टी बोरे वाल्मीकीच्या कथनात नाहीत. पद्मपुराणामध्ये रामकथा आलेली आहे. त्यात रामशबरीच्या भेटीच्या वृत्तांतात म्हटले आहे -

फलानि च सुपक्वानि मूलानि मधुराणि च।
स्वयम् आस्वाद्य माधुर्यं परीक्ष्य दृढव्रता।

शबरीने चांगली पिकलेली फळे आणि मधुर कंद मुळे, स्वतः चाखून पाहून त्यांची नीट परीक्षा करून ती स्वतः खाऊन पाहून नंतरच ती राम लक्ष्मणांना दिली.

याचा अर्थ असा दिसतो की दिसतील ती फळे न आणता तिने नीट परीक्षा करून पिकलेली मधुर फळे आणली! त्या त्या झाडाचीच फळे तिने तोडून आणली! निवडून आणली. ती उष्टी करून रामाला दिली असा काही इथे अर्थ दिसत नाही. या 'परीक्षा करून' आणलेल्या फळांनाच पुढे लोक-मानसात शबरीचे 'चिमणीचे दात' लागले आहेत. अर्थात त्यात रामाची आपल्या भक्तांच्या निरागस भक्तीला दाद देण्याचीच वृत्ती प्रकट होत असल्याचे त्याबद्दल कुणाला वैषम्य न वाटता, त्या लोककथेचे कौतुकच झाले आहे.

वाल्मीकीच्या कथनात या तपस्विनीचे शबरी हे नाव आहे. 'शबर' शब्दाचा संस्कृत भाषेतला एक अर्थ - विशिष्ट वर्गीय व्यक्ती - (ज्याचा मराठीत भिल्ल असा अर्थ झाला) असा आहे. अर्थात शबरी ही मुळात कोणीही असली तरी लोकमानसात ती भिल्ल झालेली आहे. मतंग ऋषींची ती शिष्या आहे. भारतात, विशेषतः महाराष्ट्रात, म्हणजेच दंडकारण्याच्या एका भागात मातंग समाज नावाचा एक वर्ग आहे; त्यामुळेही कदाचित मतंग ऋषींच्या या शिष्येला भिल्लपणा प्राप्त झालेला असेल. परंतु याही बाबतीत भक्त शबरीला कोणताही कमीपणा न देता तिचा समाजाने आदरच केलेला आहे, हेही लक्षणीय आहे.

या संबंधात, अध्यात्म रामायणात रामाच्या तोंडी पुढील उद्‌गार त्या रामायणाच्या लेखकाने घातले आहेत. तिथे राम म्हणतो -

पुंस्त्वे स्त्रीत्वे विशेषो वा जातिनामाश्रमादयः।
न कारणं मद्‌भजने, भक्तिर् एव हि कारणम्।।

माझी भक्ती करायला फक्त भक्ती हा एकच भाव आवश्यक आहे. (भक्ती हेच कारण आहे). तिथे पुरुष आहे की स्त्री हे वैशिष्ट्य, अशा जाती (जन्माने कोण आहे), नाम (नाव काय आहे). आश्रम (चार आश्रमांपैकी कोणत्या आश्रमात आहे म्हणजेच व्यक्ती काय वयाची आहे) इत्यादी विचारांचे काही कामच नाही!

वाल्मीकीच्या कथनात शबरी भिल्लीण नाही, की तिने बोरे उष्टी केलेली नाहीत, परंतु लोकमानसात मात्र भिल्लीण शबरी उष्टी बोरे रामाला देते आणि रामही ती आनंदाने खातो -

याचा अर्थच असा आहे, की रामाची भक्ती करणारा हा भारतीय समाज भक्ताची जात, वर्ण, नाव, आश्रम (त्यामुळे वय) हे कधीही लक्षात घेत नसतो. येथे स्त्री पुरुष समानता आहे आणि त्यांचाही भक्ती हा भावच तेवढा महत्त्वाचा आहे.

या भक्तिभावनेमुळेच 'शबरी' सर्व भारतीयांना वंदनीय झालेली आहे. साक्षात रामाचीच तिच्यावर असीम कृपा आहे.

वाल्मीकींच्या शबरी वृत्तांताचा पुढच्या काळात झालेला विकास सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचा आहे. स्त्री-पुरुष, जाति, नाम, वय, इत्यादींना मुळीच महत्त्व न देता परमेश्वर भक्तांचे प्रेमाने स्वागत करतो, हा सामाजिक संदेश या कथा-विस्तारातून देण्यात आलेला आहे.